मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मेट्रोने येत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी पदभार स्वीकारला

## महा-मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक हर्डीकर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनी 'महा-मेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी महापालिकेच्या आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारला. विशेष म्हणजे, त्यांनी या निमित्ताने मेट्रोने महापालिकेत प्रवेश करत शहराच्या सार्वजनिक वाहतुकीवरील विश्वास दाखवून दिला.

महापालिकेचे मावळते आयुक्त शेखर सिंह यांची नियुक्ती नाशिक कुंभमेळा आयुक्त म्हणून नुकतीच झाली आहे. सिंह यांच्या जागी हर्डीकर यांना महापालिका आयुक्त म्हणून अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. आज महापालिकेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने हर्डीकर यांनी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत येऊन हा पदभार स्वीकारला.



आयुक्त हर्डीकर यांनी महापालिकेत आल्यानंतर सर्वप्रथम पिंपरी चिंचवड शहराचे शिल्पकार माजी खासदार, नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी त्यांच्या समवेत आमदार अमित गोरखे हे देखील उपस्थित होते.

**प्रशासन आणि राजकारण्यांची रस्सीखेच**

महानगरपालिकेच्या वतीने अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी रस्सीखेच, संगीत खुर्ची यासह विविध खेळांचे आयोजन करण्यात आलेले होते. आयुक्त श्रावण हर्डीकर आणि आमदार अमित गोरखे यांनी रस्सीखेच व संगीत खुर्ची या खेळात सहभाग घेऊन कार्यक्रमाचा आनंद अनुभवला. त्यानंतर हर्डीकर यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील आयुक्त दालनात अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागप्रमुख व अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन कामकाजास सुरूवात केली.

### नागरिकाभिमुख प्रशासन देऊ : आयुक्त हर्डीकर

» आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर आयुक्त हर्डीकर म्हणाले, 'पिंपरी चिंचवड महापालिका ही राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक आहे. शहरातील स्वच्छता, पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि डिजिटल प्रशासन या क्षेत्रांत सतत प्रगती साधली जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरिक आणि महापालिका अधिकारी-कर्मचारी यांच्या सहकार्याने शहर विकासाच्या नव्या दिशा ठरवत, नागरिकाभिमुख प्रशासन देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू.'

---

# आपत्तीग्रस्त मराठवाड्यासह सोलापूर जिल्ह्यात तब्बल 50 गाड्या मदत रवाना!

## आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी पिंपरी-चिंचवडकरांची वज्रमुठ; आमदार महेश लांडगे यांचा विधायक पुढाकार

**पिंपरी | प्रतिनीधी**

मराठवाडा व सोलापूर जिल्ह्यासह अन्य भागातील पूरग्रस्त शेतकरी, कष्टकरी यांना "एक हात मदतीचा" या उद्देशाने पिंपरी-चिंचवडमधून एकाच दिवशी तब्बल 50 गाड्या मदत रवाना झाली. आपत्तीग्रस्त भागातील 100 हून अधिक गावांमधील सुमारे 18 हजार 400 कुटुंबांना ही मदत वितरीत करण्यात येणार आहे. या विधायक उपक्रमाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले आहे.



हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा उपक्रम हाती घेण्यात आला. लोकसहभागातून तब्बल 50 ट्रक मदत उभारण्यात आली. यामध्ये जीवनाश्यक वस्तु, अन्नधान्याचा समावेश आहे.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे गाड्यांचे पूजन करण्यात आले आणि मदत मराठवाड्यात रवाना झाली. यावेळी आमदार महेश लांडगे आणि भाजपाचे आजी-माजी पदाधिकारी तसेच हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. मराठवाड्यातील पूरग्रस्त कुटुंबांना मदतीचे कीट वितरीत करण्यात येणार आहे. त्यासाठी 50 गाड्या आणि प्रत्येक वाहनासोबत चार ते पाच स्वयंसेवक असे 300 सहकाऱ्यांसह ही मदत रवाना केली आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील भाजपा महायुती सरकारने राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 31 हजार 628 कोटी रुपयांचे मदत पॅकेज घोषित केले. पुरामुळे आपल्या जीवितहानी झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबांना राज्य सरकारने 4 लाख रुपये अनुकंपा रक्कम देण्याची घोषणा केली आहे. पशु आणि पाळीव प्राण्यांच्या नुकसानाची भरपाई, घरांच्या आणि इमारतींच्या नुकसानाची भरपाई, महायुती सरकारतील मंत्री, विधानसभा आणि लोकसभा सदस्य एक महिन्याचा पगार मुख्यमंत्री आपत्ती निवारण कोषात दान करण्याचा निर्णय केला आहे. राज्य सरकार सर्वोतोपरी मदतकार्य करीत आहे. लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात मदतकार्य करीत आहोत. मानवता जपणे ही आपली संस्कृती आहे.

मराठवाड्यातील पिंपरी-चिंचवडमध्ये वास्तव्य करणारे पिंपरी-चिंचवडकर यांच्यासह भारतीय जनता पार्टी, विविध स्वयंसेवी संस्था, संघटनांच्या माध्यमातून लोकसहभागातून मदत उभी करण्यात आली.

> "महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी आपत्ती आली, तर पिंपरी-चिंचवडकरांना मानवतेच्या दृष्टीकोनातून पुढकार घेतला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पूरपरिस्थिती व कोकणातील निसर्ग चक्रीवादळ सारख्या संकटामध्ये आम्ही "एक हात मदतीचा" हा उपक्रम हाती घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांच्या मार्गदर्शनाखाली आता पुन्हा एकदा मराठवाड्यातील पूरग्रस्तांची दिवाळी गोड करण्याचा आम्ही निर्धार केला आहे. आम्ही पिंपरी-चिंचवडकर आणि मित्र परिवार सहकारी यांच्या योगदानातून भरीव मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या टप्प्यात जीवनाश्यक वस्तू, दुसऱ्या टप्प्यात गोधन दान आणि तिसऱ्या टप्प्यात शैक्षणिक मदत व सहकार्य देण्याचा संकल्प आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# भोसरी-बोऱ्हाडेवाडी परिसरात दहशतवादविरोधी पथकाची कारवाई

## एक संशयित ताब्यात: संशयास्पद हालचालींमुळे पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये छाप

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरी बोऱ्हाडेवाडी परिसरातून दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली असून, त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

दानिश सय्यद असे या संशयिताचे नाव असल्याचे समोर आले आहे. मात्र, तपासात असे दिसून आले की, तो ज्या फ्लॅटमध्ये भाड्याने राहत होता त्या भाडेकरारावर त्याने आपले नाव 'हुसेन अब्दुला' असे नमूद केले होते.

सोसायटीतील रहिवाशांनी सांगितले की, तो काही महिन्यांपूर्वीच येथे राहायला आला होता आणि फारसे कोणाशी संपर्क ठेवत नव्हता. त्याच्या वर्तनात संशयास्पद हालचाली दिसल्याने काही रहिवाशांनी पोलिसांना माहिती दिली होती, अशीही चर्चा परिसरात आहे.

एटीएस पथकाने गुरुवारी सकाळी अचानक छापा टाकून त्या व्यक्तीला ताब्यात घेतले. त्यानंतर फ्लॅटची तपासणी करून काही कागदपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे (लॅपटॉप सह मोबाईल) जप्त करण्यात आली आहेत. सध्या दानिश सय्यद उर्फ हुसेन अब्दुला याच्याकडून चौकशी सुरू असून, त्याचे इतर कोणाशी संबंध आहेत का याबाबतही तपास सुरू आहे. या कारवाईनंतर भोसरी परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.




# 'समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता सिद्ध करा'; डॉ. प्रसाद प्रधान

## पीसीयू मध्ये 'इन्स्पिरा' मालिकेतून विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट यशासाठी मार्गदर्शन

**पिंपरी | प्रतिनीधी**

कार्पोरेट क्षेत्राच्या बदलणाऱ्या व नेहमी वाढत जाणाऱ्या अपेक्षा नव पदवीधरांनी आत्मसात केल्या पाहिजेत. पहिली नोकरी निवडताना आजचा काळ डिजिटलायझेशनचा आहे हे लक्षात घ्यावे. वेळोवेळी येणाऱ्या अडथळ्यांवर मात करून, जबाबदारी घेऊन समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता सिद्ध करावी लागेल. त्यासाठी तुमच्या मध्ये सहशीलता, स्वभावात लवचिकता हवी आणि समर्पण भावनेने काम करणे आवश्यक आहे. तरच तुमच्या व्यावसायिक आकांक्षा या नोकरी मधून पूर्ण होतील, असे मार्गदर्शन पंतप्रधान कार्यालयाचे माजी अर्थ सल्लागार व जागतिक अर्थतज्ञ डॉ. प्रसाद प्रधान यांनी केले.

बुधवारी (दि.८) पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) साते वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयू) उद्योग - विद्यापीठ संवाद केंद्राच्या माध्यमातून "पीसीयू इन्स्पिरा" या इंडस्ट्री लीडर लेक्चर सिरीज अंतर्गत "जनरल अवेअरनेस ऑन कॉर्पोरेट रिक्वायरमेंट फ्रॉम फ्रेशर्स - कॅम्पस टू करिअर" या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्र उपकुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, औद्योगिक संबंध संचालक डॉ. प्रणव चरखा, मार्केटिंग हेड व समन्वयक जमीर मुल्ला, स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे विभाग प्रमुख डॉ. अमित पाटील स्कूल ऑफ कॉम्प्युटर एप्लीकेशन चे विभाग प्रमुख डॉ. कमलेश मेश्राम आदी उपस्थित होते.

डॉ. प्रसाद प्रधान यांनी सांगितले की, प्लेसमेंट प्रक्रियेतील काळात विद्यार्थ्यांना ताण तणाव येऊ शकतो. आत्मनिर्भर संकल्पनेचा अंगीकार केल्यास व योग्य मार्गदर्शन घेऊन दृढ निश्चयाने, अनुभव घेऊन उद्योजक होणे देखील शक्य आहे. सध्या ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (जीसीसी) धोरणानुसार परदेशी गुंतवणूक वाढत आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीच्या खूप नव्या संधी निर्माण होत आहेत. मुंबईत झालेल्या ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हलचे



मध्ये भारताची डिजिटल बँकिंग आणि वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक नेतृत्व क्षमता अधोरेखित झाली असल्याचे सांगितले. तसेच, औषधनिर्माण क्षेत्र आणि डेटा सायन्स या क्षेत्रांतील वाढत्या संधी विद्यार्थ्यांना पुरक ठरणाऱ्या आहेत. भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेने आणि औद्योगिक सामर्थ्याने तरुणांसाठी विपुल संधी निर्माण होत असल्याचा विश्वास डॉ. प्रधान यांनी व्यक्त केला.

स्वागत, प्रास्ताविक करताना डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, यांनी "पीसीयू इन्स्पिरा" उपक्रम हा उपक्रम विद्यार्थ्यांना उद्योगविश्वातील वास्तव परिस्थितीची ओळख करून देण्यासाठी आणि करिअर मधे सक्षम बनवण्यासाठी राबवला जातो. पीसीयू मध्ये विद्यार्थ्यांना व्यवहार्य शिक्षण, बिझनेस केस स्टडीज आणि नेतृत्व विकासाचे मार्गदर्शन देण्यात येते. डॉ. प्रणव चरखा यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे व्यवस्थापन नेहमी उद्योगसंपृक्त शिक्षण पद्धती आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी कटिबद्ध आहे.

सूत्रसंचालन अक्षता राजगौरव, आभार संगीता मुखर्जी यांनी मानले.

कुलपती तथा पीसीईटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

# पुणे महापालिका निवडणुकीची आरक्षण सोडत लांबणीवर?

## आरक्षण सोडतीबाबत महापालिकेला कोणतेही आदेश न आल्याने ही सोडत लांबणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी अंतिम प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत आज (शुक्रवारी) १० ऑक्टोबरला होण्याची शक्यता होती. मात्र, आरक्षण सोडतीबाबत महापालिकेला कोणतेही आदेश न आल्याने ही सोडत लांबणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महापालिका निवडणुकीसाठीची आरक्षण सोडत मंगळवारी (१३ ऑक्टोबरला) होऊ शकते, असे निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर यांनी सांगितले. त्यामुळे आरक्षण सोडतीकडे डोळे लावून बसलेल्या इच्छुकांना अजून काही दिवस थांबावे लागणार आहे.

महापालिका निवडणुकीसाठी होणाऱ्या आरक्षण सोडतीकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. अंतिम प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्यांनी प्रभागात फिरण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांशी संवाद साधून प्रश्न सोडविण्यावर भर देण्यास सुरुवात झाली आहे. तर, काही इच्छुकांनी प्रभागात आरक्षण नक्की कोणते पडते, यावर लक्ष केंद्रित केले आहे. आरक्षण सोडत निश्चित झाल्यानंतरच मतदारसंघात सक्रिय होण्याची भूमिका काहींनी घेतली आहे.

निवडणुकीसाठी अंतिम प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर १० ऑक्टोबरला आरक्षणाची सोडत काढली जाईल, असे सांगण्यात येत होते. मात्र, आरक्षण सोडतीबाबत अद्याप कोणतेही आदेश आले नसल्याचे निवडणूक अधिकारी आणि उपायुक्त प्रसाद काटकर यांनी सांगितले. पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी जोरदार तयारी केली आहे.

निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांकडून शहरात दिसेल त्या ठिकाणी जाहिरातबाजी करून करून प्रभागात निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले जात आहे. निवडणुकीची तयारी करताना उमेदवारांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील केले जात आहे. गेल्या महिन्यात झालेल्या गणेशोत्सव, नवरात्रोत्सव या काळात वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून इच्छुकांनी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे.

दिवाळी सणाचे औचित्य साधून मतदारांच्या घरापर्यंत तसेच त्यांच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत कसे पोहोचता येईल याची नियोजन जोरदार सुरू आहे. यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न देखील केले जात आहे. प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांची संवाद, तरुण कार्यकर्त्यांचा वाढदिवस, महिला मंडळांसाठी कार्यक्रम यावर भर दिला जात आहे.



### इच्छुकांची जोरदार तयारी

» आठवडाभरावर येऊन ठेपलेल्या दिवाळीसाठी देखील इच्छुकांनी जोरदार तयारी केली आहे. दिवाळी सणाचे औचित्य साधून मतदारांच्या घरापर्यंत तसेच त्यांच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत कसे पोहोचता येईल याची नियोजन जोरदार सुरू आहे. यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न देखील केले जात आहे. प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांची संवाद, तरुण कार्यकर्त्यांचा वाढदिवस, महिला मंडळांसाठी कार्यक्रम यावर भर दिला जात आहे. प्रभागातील आरक्षणाची सोडत जाहीर झाल्यानंतर प्रचाराला अधिक वेग येणार आहे.

### राजकीय फलकांना अभय ?

» निवडणुकीच्या कामांचे कर्मचारी, अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी महापालिकेने प्रशिक्षण कक्ष स्थापन केला आहे. या कक्षाच्या माध्यमातून कर्मचारी अधिकारी यांना वेगवेगळ्या पातळीवर प्रशिक्षण देण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. यशदा येथील सहाय्यक प्राध्यापक यांच्यासह वेगवेगळ्या पातळीवरील प्रशिक्षकांची नियुक्ती महापालिकेने केली आहे. प्रशिक्षणाची जोरदार तयारी सध्या सुरू असून मतदार याद्या फोडत असताना त्यामध्ये कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी प्रत्येकाकडे विशिष्ट जबाबदारी देण्याचे नियोजन सुरू असल्याचे निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# पुणे-बंगळुरु महामार्गावर 'ट्रान्झिट हब', वाहतूक कोंडी फोडण्यासाठी प्रस्ताव

## हिंजवडी, वाकड, बालेवाडी भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बालेवाडी येथे 'ट्रान्झिट हब' साकारण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) १० एकर जागेसाठी सहमती दर्शवली आहे. मात्र, त्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) समन्वयातून निधी उभारून ही जागा विकसित करावी, असा प्रस्ताव विभागीय आयुक्तालयाकडे पाठविण्यात आला आहे.

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील हिंजवडी, वाकड, बालेवाडी भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. बंगळुरूकडून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहने लांब पल्ल्यामुळे वाकड येथील जकात नाका येथे थांबतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. विशेषतः हिंजवडी परिसरात होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे पालकमंत्री अजित पवार यांनी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना स्थानिक प्रशासनाला केल्या होत्या.

त्या पार्श्वभूमीवर पीएमपीने बालेवाडी क्रीडा संकुलाजवळील आगार असलेल्या १० एकर जागेत 'ट्रान्झिट हब' साकारण्यासाठी प्रस्तावित केले. याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठवून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या आणि मुंबईकडून पुणे, सातारा, कोल्हापूर असे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना थांबा मिळावा, संबंधित माल त्या ठिकाणी उतरवून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेद्वारे तेथून पुढे वाहतूक करावी, या दृष्टीने वाहतुकीचे नियोजन केल्यास कोंडीत पडणारी भर कमी होईल, असा विश्वास पीएमपी महामंडळाचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी केला.

देवरे म्हणाले, 'महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ट्रान्झिट हबसाठी बालेवाडी येथील जागा उत्तम आहे. त्यामुळे हिंजवडी, म्हाळुंगे, वाकड, बाणेर, बालेवाडी या परिसरातील वाहतूक कोंडी सुटेल. रस्त्यांच्या कडेला थांबवणाऱ्या अवजड वाहनांना स्वतंत्र जागा उपलब्ध होईल. पीएमपी किंवा इतर प्रवाशांसाठी विशेष आगार व्यवस्था उभी करून त्या ठिकाणावरून शहरात सुरळीत वाहतूक करता येणे शक्य होईल.



> सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत एकाच छताखाली सार्वजनिक, खासगी वाहनांना जागा उपलब्ध व्हावी म्हणून पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील ट्रान्झिट हब महत्त्वाचे ठरणार आहे. यामुळे वाहतूक कोंडी कमी होईल. पीएमपी प्रशासनालाही याचा मोठा फायदा होईल, असा मानस आहे.
>
> - पंकज देवरे, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, पीएमपी

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना महावितरणचा शॉक

## आंबेगाव तालुक्यातील घोडनदी-मीना काठावरील वीजबिल थकलेल्या साडेसात एचपीच्या पुढील शेती पंपांचे वीज कनेक्शन कट करण्याची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना महावितरणने शॉक दिला आहे. एकीकडे सरकार अतिवृष्टीधारक शेतकऱ्यांना मदत करण्याची घोषणा करते तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शेती पंपाचे वीज बिल न भरल्यामुळे वीज कलेक्शन तोडून शेतकऱ्याची क्रूर थट्टा करत असल्याचा प्रकार आंबेगाव तालुक्यात सुरू झाला आहे.

महावितरण कंपनीने आंबेगाव तालुक्यातील घोडनदी-मीना काठावरील वीजबिल थकलेल्या साडेसात एचपीच्या पुढील शेती पंपांचे वीज कनेक्शन कट करण्याची कारवाई केल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. शेती पंपाचे वीज कनेक्शन कट होत असल्याने हजारो शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला आहे.

सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करत असून शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी साडेसात एचपीपर्यंतच्या विद्युत मोटारींचे लाईट बिल माफ केले व पुढेही या मोटारींना मोफत वीज देण्याचे पाऊल उचलले. परंतु दहा एचपी,पंधरा एचपी व वीस एचपीच्या शेती पंपाच्या मोटारींचे वीजबिल माफ केले नाही. त्यामुळे साडेसात एचपीच्या पुढील शेती पंपाच्या मोटारीची वीजबिलाची रक्कम मोठ्या प्रमाणावर थकली असून महावितरण कंपनीने वीजबिल थकलेल्या मोटारींचे कनेक्शन कट करण्याची कारवाई केली आहे. शेती पिकांना बाजारभाव नसल्याने शेतकरी वर्ग आर्थिक अडचणीत सापडला आहे.

शासनाने अल्पभूधारक शेतकऱ्यांची व्याख्या व्यवस्थित न करता सरसकट साडेसात एचपीपर्यंत वीजबिल माफ केले व तेथून पुढे अनेक अल्पभूधारक शेतकरी शेती पंप वीज बिलाच्या बोजात अडकला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शेती पंपाचे कनेक्शन कट करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलन केले जाणार आहे




### आंदोलनाचा इशारा

» शासनाने अल्पभूधारक शेतकऱ्यांची व्याख्या व्यवस्थित न करता सरसकट साडेसात एचपीपर्यंत वीजबिल माफ केले व तेथून पुढे अनेक अल्पभूधारक शेतकरी शेती पंप वीज बिलाच्या बोजात अडकला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शेती पंपाचे कनेक्शन कट करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलन केले जाणार आहे, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी दिला

> “ प्रचंड पावसामुळे शेती पिके हातातून गेली. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असताना शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याऐवजी त्यांच्या शेती पंपाची वीज कनेक्शन कट करून शेतकऱ्यांची सरकारने थटा सुरू केली आहे.
>
> - सुरेश भोर,अध्यक्ष, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, पुणे जिल्हा.

> “ गेल्या चार महिन्यांपासून पडणाऱ्या पावसाने आधीच शेतकऱ्यांची शेती पिके सडून गेली. त्याला मदत करण्याचे सोडून शेती पंपाची वीज कनेक्शन तोडून शेतकऱ्यांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम सरकारने सुरू केले आहे.
>
> - कान्हू करंडे, माजी सरपंच, काठापूर.

> “ राज्यभरात महावितरण कंपनीच्या माध्यमातून साडेसात एचपीपेक्षा जास्त एचपी असणाऱ्या वीज मोटारींचे बिल थकले आहे.अशा मोटारींचे कनेक्शन बंद केले आहे. शेतकऱ्यांनी चालू वीज बिल व जुन्या थकलेल्या वीज बिलाची काही रक्कम भरावी व वीज पुरवठा सुरळीत करुन महावितरण कंपनीस सहकार्य करावे.
>
> - नितेश भसारकर,सहाय्यक अभियंता, महावितरण निरगुडसर.

---

# जागेचा व्यवहार 30 कोटी नव्हे; अवघा साडेसात कोटींचा : आमदार शरद सोनवणे

## नारायणगाव बस स्थानकापासून नारायणगाव उपबाजार समितीपर्यंत जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे यांनी बाजार समितीच्या जागेचा नव्याने केलेला व्यवहार वरवर ३० कोटीचा दिसत असला तरी खरा व्यवहार साडेसात कोटीचा आहे. राहिलेले साडे बावीस कोटी कुठे गेले? अशावेळी जुन्नर तालुक्याचा सहाय्यक निबंधक कोणाचे ऐकणार? असा संतप्त सवाल आमदार शरद सोनवणे यांनी केला. पुढील काळात संघर्षाची लढाई झाली तर माझ्या मायबाप शेतकऱ्यांच्या आणि माय भगिनींच्या डोक्यावरून आमदारकी ओवाळून टाकेल आणि शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी उभा राहील. संजय काळे यांनी साडे बावीस कोटींपैकी तीन कोटी वाटायला ठेवले. कोणी बोलला तर त्याला पाकीट द्यायचे. रावणाची सोन्याची लंका जळाली तिथे काळेंची सहकाराची चोरलेली खुर्ची जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाही.

यावेळी आमदार शरद सोनवणे, बाजार समितीचे संचालक व शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख माऊली खंडागळे, शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख व नारायणगावचे उपसरपंच बाबूभाऊ पाटे, बाजार समितीचे माजी सभापती रघुनाथ लेंडे, जनमंगल संस्थेचे सचिन वाळुंज, शेतकरी यांच्या नेतृत्वाखाली नारायणगाव बस स्थानकापासून नारायणगाव उपबाजार समितीपर्यंत जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. मोर्चात मोठ्या प्रमाणात शेतकरी व महिलांचा समावेश होता.



### आजच उद्घाटन का घेतले?

» सन २०१० पासून १३ एकर जागा पडून असताना आजच उद्घाटन का घेतले? जुन्नर तालुक्याचा सहाय्यक निबंधक हरामी आहे. निबंधकाचं तीन पिढ्याचं वाटोळ झाल्याशिवाय राहणार नाही. संजय काळे यांच्या पुढील पाचपिढ्या भिक मागणार, हा शेतकऱ्यांचा तळतळाट आहे. तीन विरोधक संचालकांनी आवाज उठवल्यानंतर तुम्ही २०१० साली खरेदी केलेल्या जागेच्या उद्घाटनाचा घाट आज घातला. चांगल्याला साथ देण्यासाठी रक्तामध्ये चांगुलपणा असावा लागतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार असावे लागतात. हे संजय काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमितील लोकांची बोली लावली. सकाळी नरम संध्याकाळी गरम असा झाला हा बेशरम, अशा शब्दात काळे यांच्यावर शरद सोनवणे यांनी घणाघात केला.